या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

**प्रतिनिधी नेमणे आहे.**

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | मंगळवार ३० एप्रिल २०२४ | अंक१४१ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# धनंजय मुंडे यांचं बहिण पंकजा यांच्याबाबत मोठं विधान

लोकसभा निवडणुकीदरम्यावन सर्वाधिक चर्चेत असणाऱ्या मतदारसंघांपैकी एक म्हणजे बीड लोकसभा मतदारसंघ... या मतदारसंघातील लढतीकडे सर्वांचं लक्ष आहे. प्रितम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यंदा या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. पंकजा मुंडे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते बजरंग सोनवणे यांच्यात ही लढत होत आहे. पंकजा यांचा प्रचार करण्यासाठी त्यांचे बंधू, राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे देखील मैदानात आहेत. आज प्रचारसभेत बोलताना पंकजा मुंडे बीडमध्ये



येताना केंद्रीय मंत्री म्हणून येतील, असं धनंजय मुंडे म्हणाले. बजरंग सोनवणे यांना टोला आज समोरील उमेदवार हे जातीपातीचे राजकारण करत आहे. त्यांनी अगदी सुरुवातीलाच स्वतःचे कुणबी प्रमाणपत्र काढून घेतलं. त्यावर कोणाचाही आक्षेप नाही. मात्र स्वतःचं कुणबी प्रमाणपत्र गुपचूप काढून घेऊन त्याचा राजकीय लाभ एका निवडणुकीत घेतला. त्याऐवजी वीस – पंचवीस हजार गोरगरीब आणि गरजू लोकांना या कुणबी प्रमाणपत्राचा लाभ मिळवून दिला असता तर खरंच यांच्या मनाचा मोठेपणा आम्ही पाहिला असता. आता त्यांनी त्यांनी कुणबी प्रमाणपत्र घेतल्याने ओबीसी विरूद्ध मराठा अशी लढत नसून ओबीसी विरूद्ध ओबीसी अशीच लढत होत आहे, अशा शब्दात धनंजय मुंडे यांनी बजरंग सोनवणे यांना टोला लगावला आहे.

### मोदींच्या कामाचं कौतुक

भारत देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात कोरोना महामारीच्या काळात अनेक इतर देशांना मदत केली. आज कोट्यावधी कुटुंबांना मोफत राशन दिलं जातं. ते सुद्धा कोणाचीही जात किंवा धर्म न पाहताच दिलं जातं. याही पलीकडे जाऊन नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वात देश प्रगती करत आहे. त्याच प्रकारची प्रगती आणि विकास बीड जिल्ह्याला अपेक्षित आहे. आता बीड जिल्हा सुद्धा जात-पात धर्म या गोष्टींना थारा न देता कर्तृत्व अंगी असलेल्या आणि विकासाची क्षमता

# बजरंग सोनवणेंच्या विजयासाठी पाटोदा तालुका सरसावला!

## पाटोदा तालुक्यातील नेते कार्यकर्त्यांसह जनता लागली कामाला

**पाटोदा | प्रतिनिधी**

दी कॉंग्रेस पक्ष शरद चंद्र पवार व इंडिया आघाडीचे 39 बीड लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांच्या प्रचारार्थ सारिका बजरंग सोनवणे यांचा पाटोदा तालुक्यातील सोमवार दिनांक 29/04/2024 चा दौरा अतिशय मोठ्या उत्साहात संपन्न झाला. पाटोदा तालुक्यातील नेते कार्यकर्ते आणि जनता बजरंग सोनवणे यांना विजयी करण्यासाठी सरसावली आहे. पाटोदा तालुक्यातील उखंडा, पिठी, नायगाव, रोहतवाडी, बेदरवाडी, डोमरी, निरगुडी, तगारा, दसपिंपळगाव, सगळेवाडी, गारमाथा, भाटेवाडी,





नाळवंडी, कारेगाव, जालनेवाडी, मांडवेवाडी, तुपेवाडी, मळेकरवाडी, तळेपिंपळगाव, जवळाला, बेलेवाडी, नफरवाडी, मेंगडेवाडी यांच्यासह पाटोदा तालुक्यातील अनेक गावांना भेटी देऊन सारिका सोनवणे यांनी जनतेला संबोधित करत तुतारी वाजवून जाणता राजा शरदचंद्रजी पवार साहेबांचे हात बळकट करण्यासाठी आव्हान केले. यावेळी पाटोदा तालुक्यातील सर्व नेतेमंडळी कार्यकर्ते आणि प्रत्येक गावातील जनता तितक्यात उत्साहाने स्वागतासाठी तयार होती. पाटोदा तालुक्यात तुतारी जोरदार वाजणार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे व आघाडीचे उमेदवार बजरंग मनोहर सोनवणे यांची निशाणी तुतारी पाटोदा तालुक्यात जोरदार घुमू लागली आहे. सर्व जनतेच्या तोंडी तुतारीचा आवाज आल्याने मतदार रुपी तुतारी जोरदार वाजणार असल्याचा सुद्धा पाटोदा तालुक्यातील समोर येत आहे.

## कॉंग्रेसने ४० वर्ष सैनिक कुटुंबांना वंचित ठेवलं -पंतप्रधान मोदी



सातारा लोकसभा मतदारसंघाचे भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचाराच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज साताऱ्यात जाहीर सभा पार पडली. या सभेत नरेंद्र मोदी यांनी कॉंग्रेसवर निशाणा साधला. “साताऱ्याची ही भूमी शौर्याची भूमी आहे. आज मिलिट्री आपशिंगे गाव असो किंवा साताऱ्याचा कोणतही सैनिक परिवार असेल, आत्मनिर्भर भारतीय सेनेला पाहून ते सर्वात जास्त आनंदी आहेत. आपल्या सेनेकडे आज एकापेक्षा एका भारतीय बनावटीचे हत्यार आहेत. आता तुम्हीच सांगा, असे कामे करुन मोदींनी ज्यांची दुकाने बंद केली ते खूश होतील का? हत्यारांच्या ज्या दलालांना कॉंग्रेसचं सरकार खूप चांगलं वाटतं होतं ते मोदीची वाहवाह करतील का?”, असे प्रश्न नरेंद्र मोदी यांनी उपस्थित केले.

“मोदीने सैनिक कुटुंबांना वन रँक वन पेन्शनची गॅरंटी दिली होती. मोदीने ही गॅरंटी पूर्ण करुन दाखवली. कोण कसं विसरु शकतं की कॉंग्रेसने 40 वर्षांपर्यंत सैनिक कुटुंबांना वन रँक वन पेन्शन पासून वंचित ठेवलं. फक्त 500 कोटी रुपये दाखवून ही योजना आणणार असे सांगायचे. खोटं बोलण्यात त्यांची मास्टरी आहे. भाजपच्या सरकारने आज या योजनेचे 1 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे माजी सैनिकांना देवून टाकले आहेत”,

# आज तांदळवाडी येथील संत वामणभाउंच्या नारळी सप्ताहाचा समारोप समाप्ती मोढ्या संखेने उपस्थित रहा आयोजकाचे आवाहन

**शिरूर कासार**

प्रातःस्मरणीय संत वामनभाऊ महाराज यांनी आरंभीरलेल्या ९२ व्या नारळी सप्ताहाची सांगता आज दिनांक ३० मंगळवार रोजी मोठ्या थाटात संपन्न होत असून या निमित्त तांदळवाडी व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महंत ह भ प विठ्ठल महाराज व ग्रामस्थ तांदळवाडी भिल्ल जि बीड यांनी केले आहे .



गेल्या सात दिवसापासून सुरू असलेल्या या नाम सप्ताहाची सांगता आज मंगळवार दिनांक 30 एप्रिल रोजी सकाळी अकरा ते एक ह भ प गुरुवर्य महंत विठ्ठल महाराज श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होऊन महाप्रसादाने या सप्ताहाची सांगता होणार आहे

यांप्रसंगी बीड जिल्ह्यातील नामवंत व ख्यातनाम सर्व मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत तेव्हा महाप्रसादासाठी सर्व भाविक भक्तांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे संत महंतांची मांदियाळी ! संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभीरलेल्या ९२ व्या नारळी सप्ताहाची आज सांगता होत असून यानिमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम संत महंतांची या ठिकाणी उपस्थित राहणार आहे तेव्हा या सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी व महाप्रसाद घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील तमाम भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थ तांदळवाडी जिल्हा बीड यांनी केले आहे

# भरपावसात पंकजा मुंडेंची तुफान बॅटींग; म्हणाल्या, तुम्ही माझ्यावर मताचा पाऊस पाडा

**बीड प्रतिनिधी**

महायुतीच्या उमेदवार असलेल्या पंकजा मुंडे यांनी बीड लोकसभा निवडणुकीसाठी बीडच्या नाळवंडी गावात पंकजा मुंडेंनी जाहीर सभा घेतली. यावेळी पावसाने देखील हजेरी लावली होती. पाऊस कोसळत असला तरी पंकजा मुंडेंनी पावसात जोरदार बॅटींग केली. यावेळी पंकजा मुंडे यांनी नागरिकांना आवाहन केलं. असाच मताचा पाऊस तुम्ही माझ्यावर पाडा. मी तुमच्यावर विकासाचा पाऊस पाडेल. मला एकदा संसदेत पाठवा. मी बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करेल, असं आश्वासन पंकजा मुंडेंनी दिलं. तर भाषण सुरू असताना पाऊस आला म्हणजे बीड जिल्ह्याच्या उज्वल भविष्याचा संकेत आहे. माझा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचण्यापासून कोणीही रोखू शकत नाही, असं पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. पुढे त्या असंही म्हणाल्या, विरोधाकडे सध्या मुद्दा नाही. त्यामुळे तुमचं मत वाया घालू नका. बीड जिल्ह्याला विकास काय असतो, हे मी दाखवून दिलं आहे. जात-पात धर्म सोडून मला मतदान करा. पुढच्या लोकसभेच्या निवडणुकीत मी माझ्यासाठी आणि माझ्या परिवारातील कोणासाठी मत मागायला येणार नाही.



## संपादकीय

# महाराष्ट्र माझा

मंगल देशा l पवित्र देशा l महाराष्ट्र देशा l प्रणाम घ्यावा माझा हा,श्री महाराष्ट्र देशा ll राकट देशा l कणखर देशा, दगडांच्या देशाlनाजुक देशा कोमल देशा,फुलांच्याहि देशाl असे महाराष्ट्राचे सुंदर वर्णन राम गणेश गडकरी यांनी त्यांच्या लेखणीतून केलेली आहे. आज १ मे महाराष्ट्र राज्याची स्थापना दिवस. राज्यात सर्वत्र महाराष्ट्र दिन साजरा केला जातो.सर्वप्रथम सर्वांना "महाराष्ट्र दिनाच्या" व "जागतिक कामगार दिनाच्या" हार्दिक शुभेच्छा. महाराष्ट्राचा सांस्कृतिक व सामाजिक आणि ऐतिहासिक वाटा फार मोठा आहे. महाराष्ट्राच्या संस्कृतीत अनेक सण-उत्सव मोठ्या उत्साहाने पारंपारिक पद्धतीने साजरे केले जातात. प्रत्येक सण हा मराठी माणसाला एक संदेश देऊन जातो. या महाराष्ट्राच्या मातीत अनेक संत,कलावंत,साहित्यिक, कलाकार,गायक,वादक असे अष्टपैलू जन्माला जन्मलेले आणि वाढले.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज या मातीत जन्मले आणि लढले व मराठ्याचे तोरण उभारले असे थोर व्यक्तिमत्व शुरवीर जाणता राजा होऊन गेला.तसेच संत तुकाराम,संत रामदास,संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत मुक्ताबाई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा असे अनेक संत याच मातीत होऊन गेले. त्यानी अनेक अनेक अभंग, ओव्या,भारुडे, श्लोक रचले आणि एक चांगला संदेश महाराष्ट्राला दिला. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली हा दिवस महाराष्ट्रात मराठी माणसे मोठ्या उत्साहाने साजरा करतात.या दिवशी 1960 साली तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची मुहूर्तमेढ रोवली. यानंतर त्यांनी ही यशवंतराव चव्हाण यांच्या हाती महाराष्ट्राच्या नेतृत्वाचे सूत्रभार सांभाळण्याची जबाबदारी दिली. महाराष्ट्र दिना बरोबरच हा दिवस "जागतिक कामगार दिवस" म्हणून साजरा केला जातो. कामगारांना अल्प मजुरीच्या बद्दल्यात 12 ते 24 तास राबवून घेतले जात होते. याच विरोधात सर्व कामगार एकत्र येऊन आंदोलन केले. म्हणूनच १ मे ला कामगार दिवस सुद्धा म्हटले जाते.

शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, वासुदेव बळवंत फडके यासारख्या अनेक देशभक्तांनी इंग्रजांविरुद्ध बंड पुकारले. या महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी त्यांचे मोठे योगदान आहे. महात्मा फुले,सावित्रीबाई फुले,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजात जनजागृतीचे काम केले. लेखक, कवी, साहित्यिक ह्यानी आपल्या लेखनातून महाराष्ट्राला चांगला संदेश दिला. असे अनेक रत्ने महाराष्ट्रात होऊन गेली. हे महाराष्ट्राचे मोठे भाग्य आहे कला,शिक्षण ,चित्रपट,संगीत अशा विविध क्षेत्रात सुद्धा महाराष्ट्राने उत्तुंग भरारी घेतली., अशा या महान वैभवशाली महाराष्ट्राच्या मराठी मातीत जन्माला आल्याचा अभिमान बाळगावा.

महाराष्ट्र हा शब्द दोन शब्दापासून बनलेला आहे महा व राष्ट्र या शब्दांचा शाब्दिक अर्थ होतो महान राष्ट्र . याशिवाय महाराष्ट्राची विशिष्ट भौगोलिक व सांस्कृतिक ओळख ही सांस्कृतीक वारसेमुळे विशेष ओळखला जाते. महाराष्ट्राच्या उत्तरेकडच्या भागात सातपुडा पर्वत रांगा आहेत. पश्चिमेला अरबी सागर स्थित आहे. महाराष्ट्रातील अधिकांश भागातील जागा बेसाल्ट खडकापासून निर्माण झालेली आहे. कळसुबाई हे सर्वात उंच शिखर महाराष्ट्राला लाभलेले आहे. याची या शिखराची उंची १६४६ मीटर आहे. गोदावरी, कृष्णा, भीमा,नर्मदा,वैनगंगा,पंचगंगा अशा मोठ्या नद्या याच महाराष्ट्रातून वाहतात.तसा महाराष्ट्राचा इतिहास फार जुना आहे. महाराष्ट्रातील जवळपास अधिक लोकसंख्या शहरात राहते. पर्यटनाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र हा संपन्न राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक प्राचीन गुहा, वस्तुशिल्प व पर्यटन स्थळे आहेत शिवाय महाराष्ट्रातील पुणे शहरात अनेक दर्शनीय स्थळे आहेत शनिवार वाड्या सारखा ऐतिहासिक वारसा जपणारा राजवाडा आहे. औरंगाबाद मधील अजंठा-वेरूळ गुफा कलाकृती म्हणून प्रसिद्ध आहेत.

महाराष्ट्रात हिंदू जनसंख्या अधिक आहे.येथील प्रमुख सण गणेश चतुर्थी, याशिवाय दिवाळी,दसरा, होळी, ईद,नाताळ इत्यादी सणही मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. महाराष्ट्र हे एक संपन्न असे राज्य आहे महाराष्ट्राला प्राचीन इतिहास व सांस्कृतिक वारसा लाभला आहे.महाराष्ट्राची प्रशंशा करतांना राष्ट्रपिता महात्मा गांधीजीनी महाराष्ट्र म्हणजे कार्यकरत्याचे मोहोळ अशा शब्दात म्हटले आहे. तसेच ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या महान कवियत्री महादेवी वर्मानी महाराष्ट्र हा भारताच्या सिंहद्वाराचा प्रहरी आहे.अशा शब्दात गौरव केला. महाराष्ट् संत महंत ऋषिमुनी शूरवीरांची साहित्यिक खेळाडू या मातीत जन्माला आले.या महाराष्ट्राच्या मातीचे कितीही गुणगान गायीले तरी थोडेच आहे.

**सौ.ज्योत्स्ना भास्कर बन्सोड**
**कुरखेडा जि.गडचिरोली**

# औद्योगिक क्रांती: एक नवा युग प्रारंभ!

(विश्व कामगार दिवस विशेष.)

भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता. भारतात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो. सदर ज्ञानवर्धक संकलित माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी देताहेत... संपादक.

सतराव्या शतकाच्या मध्यात सुरु झालेल्या औद्योदिक क्रांतीने युरोपमध्ये एका नव्या युगाची सुरुवात केली होती. मात्र या नवीन युगाबरोबरच नव्या समस्याही उदयास आल्या. त्यातील एक समस्या होती कामगरांची. युरोपात औद्योगिक क्रांतीला सुरुवात तर झाली मात्र कामगार वर्गाचे शोषण वाढीस लागले. त्यावेळी कामाचे तास हे आठ दहा नव्हते. तर कामगारांना तब्बल १५ तास काम करावे लागे. त्यातल्या त्यात जनावरासारखं काम करून मोबदलाही मिळत नव्हता. मात्र मजुरांनी याविरोधात आंदोलन पुकारलं. कामगारांच्या या पाऊलाने जगाच्या पाठीवर कामगारांचा नवा इतिहास कोरला गेला. मात्र आजही उद्योगहीन गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात नव्याने सुरू झालेल्या कंपन्या, उद्योगमालक कामगारांना मनमर्जीने खूप राबवून- शोषण करून घेत रग्गड मुनाफा कमवत आहेत. दररोज १० ते १२ तास कष्टवून घेत आहेत. रविवार जागतिक- सार्वजनिक सुट्टीचा वार असूनही सुट्टी मिळत नाही. कोणीही याबद्दल आवाजही उठवत नाही. कारण कामावरून काढून टाकण्याची धमकी पेरली जात आहे. याचेच मोठे नवल वाटते! विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षणसम्राट महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रयत्नांना व विचारांना बेमूर्वत पायदळी कुस्करले जात आहे.

आजच्या दिवशी अमेरिकेत कामगारांनी ७ तासांचे काम असावे अशी मागणी केली होती. ऑस्ट्रेलियात ही चळवळ पुढे आठ तासांचा दिवस म्हणून ओळखली जाऊ लागली. २१ एप्रिल हा दिवस तेव्हापासून ऑस्ट्रेलियात कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. मात्र १ मे रोजी ऑस्ट्रेलियात थरारक घटना घडली. युनायटेड स्ट्रेड्समधील कामगारांनी आठ तास काम करण्याचे आवाहन पुकारले. मागण्यांसाठी संप आणि मोर्चे निघाले. मात्र त्यावेळी झालेल्या आंदोलकांना पोलिसांनी ट्रकने हुसकावून लावले. या घटनेने कामगारांतील संताप आणखी वाढला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांवर बॉम्बस्फोट करण्यात आले. यात ७ पोलिस आणि ४ नागरिकांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आठ जणांना अटक होऊन फाशीची शिक्षा सुणावण्यात आली. या घटनेने जगभर संताप व्यक्त झाला. कारण या ८ जणांपैकी कोणीही बॉम्ब फेकले नसल्याचे सांगण्यात येत होते. अशा प्रकारे या रक्तरंजित आंदोलनानंतर १ मे १९८० रोजी कामगार चळवळ यशस्वी झाली. न्याय्य वेतन, चांगली वागणूक, पगारी रजा आणि ८ तास काम या मागण्या मान्य करण्यात आल्या. तेव्हापासून हा दिवस अमेरिकेत कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९०४मध्ये एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय संघ परिषदेने जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस ८ तासांचा दिवस म्हणून पाळण्याचे आवाहन केले. भारतीय मजदूर किसान पक्षाने दि.१ मे १९२३ रोजी सर्वप्रथम कामगार दिन साजरा केला. त्याच वेळी भारतात प्रथमच कामगार दिनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल ध्वज वापरण्यात आला.

१ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. कामगार दिन साजरा करण्याची सुरुवात कामगारांच्या हितानिमित्त झालेल्या एका चळवळीतून झाली. १९व्या शतकाच्या मध्यावर कामगारांच्या एका तीव्र चळवळीला सुरूवात झाली. ज्यात कामगारांच्या हितासाठी काही मागण्या करण्यात आल्या होत्या. पहिली मागणी २१ एप्रिल १८५६ रोजी ऑस्ट्रेलियातील कामगारांनी केली होती. दिवसाचे कामाचे तास ठराविक असावेत यासंदर्भात ही मागणी होती. ऑस्ट्रेलिया पाठोपाठ पुढे मग अमेरिका, कॅनडामधील कामगार संघटनांनी पुढाकार घेत १९८६मध्ये कामगारांच्या हितासाठी मोर्चे काढण्यास सुरुवात केली. अशाच एका मोर्च्यामध्ये शिकागो मधील सहा आंदोलकांचा मृत्यू झाला. ज्याबद्दल कामगारांनी तीव्र निषेध व्यक्त केला. पोलिसांवर राग व्यक्त करण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने बॉम्ब टाकला आणि त्यात आठ पोलिसांचा मृत्यू आणि पन्नास पोलीस जखमी झाले होते. याची शिक्षा म्हणून आठ आंदोलन कर्त्यांना फाशी देण्यात आली होती. मात्र त्यामुळे जगभरात संतापाची लाट पसरली, कारण त्या आठ जणांपैकी एकानेही बॉम्ब फेकलेला नव्हता. या रक्तरंजित इतिहासानंतर या आंदोलनाला एक भव्य दिव्य स्वरूप प्राप्त झाले. सन १९९०ला कामगारांची ही चळवळ यशस्वी झाली. शिकागोमधील या घटनेचे स्मरण करण्यासाठी रेमंड लेविन यांनी आंतरराष्ट्रीय आंदोलनाचे आयोजन करण्याची मागणी केली. त्यांनी ही मागणी १९८९ साली आयोजित दुसऱ्या आंतरराष्ट्रीय पॅरीस परिषदेत केली होती. त्या परिषदेमध्ये १ मे १८९० हा दिवस जागतिक एकता दिवस म्हणून साजरा करण्याचे निश्चित करण्यात आले. पुढे १८९१च्या दुसऱ्या परिषदेत या कार्यक्रमाला औपचारिक मान्यता देण्यात आली. ज्यामुळे आज जगभरात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस कामगारांच्या हितानिमित्त केल्या गेलेल्या त्या चळवळीचे प्रतिक आहे. ज्यामध्ये कामगारांनी दिवसाचे कामाचे तास आठ असावेत, अशी प्रमुख मागणी केली होती. कारण त्यापूर्वी कामगारांना दिवसभरात पंधरापेक्षा जास्त तास काम करावे लागत असे. पुढे लोक या चळवळीला आठ तासांची चळवळ म्हणूनही ओळखू लागले. या चळवळीत कामगारांच्या कामाच्या तासांसोबतच त्यांना कामाच्या बदल्यात मिळण्याऱ्या वागणूक आणि मोबदल्या विषयीही प्रमुख मागण्या करण्यात आलेल्या होत्या. शिकागो आंदोलनानंतर कामगारांना आठ तासांचे काम, योग्य मोबदला, चांगली वागणूक, पगारी सुट्टी मिळू लागली. निरनिराळ्या समाजवादी, साम्यवादी आणि अराजकवादी गटांनी केलेल्या निर्दशनासाठी १ मे हा दिवस ओळखला जातो. युरोपमध्ये पूर्वीपासून १ मे हा दिवस वसंतउत्सव म्हणूनही साजरा केला जात असे. पुढे या आंदोलनामुळे युरोपमध्ये ही हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा होऊ लागला. सन १९०४ साली एमस्टरडॅम येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक परिषदेत संपूर्ण जगभरातील कामगार संघटनांना १ मे हा दिवस कामगार दिन म्हणून साजरा करावा असं आवाहन करण्यात आलं होतं. आजही अनेक प्रमुख देशांमध्ये १ मे निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली जाते. त्याचप्रमाणे या दिवसानिमित्त अनेक देशांमध्ये खास कार्यक्रम आणि सैन्याचे संचलन आयोजित केले जाते. भारतात लेबर किसान पार्टीने १ मे १९२३ साली पहिल्यांदा कामगार दिन साजरा केला होता. त्यावेळी भारतात कामगारांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी लाल रंगाचा झेंडा वापरण्यात आला होता. भारतात १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली म्हणून महाराष्ट्र दिन म्हणूनही साजरा केला जातो.

ज्या लोकांकडे पुरेसे शिक्षण नाही किंवा ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही, अशा लोकांना आयुष्यात भरपूर कष्टाची कामे करावी लागतात. जगण्यासाठी पुरेसा पैसा कमवणे याची चिंता करण्यात त्यांचे आयुष्य जाते. कामगार चळवळीनंतर कामगाराच्या हितासाठी प्रत्येक देशात काही कायदे करण्यात आले आहे. भारतीय कामगार कायदा म्हणजे भारतातील कामगारांचे नियम करणारा कायदा. भारतात कामगारांना योग्य संरक्षण मिळावे यासाठी काही कायदे करण्यात आलेले आहेत. यात २०० राष्ट्रीय आणि ५० केंद्रिय कायद्यांचा समावेश आहे. भारतातील कामगार कायद्यांची व्याख्या एकसंध नाही. कारण सरकार स्थापना आणि भारतीय घटनेच्या समवर्ती यादीत कामगार हा एक विषय असल्यामुळे ते प्रत्येक राज्यात भिन्न आहेत. मात्र भारतात यासंदर्भात एक महत्त्वाचा कायदा नक्कीच करण्यात आला आहे. जो आहे "दी चाईल्ड लेबर एक्ट ऑफ १९८६" थोडक्यात बालकामगार कायदा. लहान मुलांच्या हितासाठी करण्यात आलेला हा कायदा आहे. बऱ्याचदा लहान वयातच कष्टाची कामे करावी लागल्यामुळे अनेक लहान मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. या कायद्यानुसार भारतात चौदा वर्षांखालील बालकांना मजूरी अथवा काम करण्यास मनाई आहे. कामगारांच्या कामाची गुणवत्ता वाढवणे तसेच लहान मुलांचा मजूरीसाठी गैरवापर आणि छळवणूक टाळणे यासाठी हा कायदा करण्यात आलेला आहे. १ मे या दिवसाला महाराष्ट्रात खूप महत्त्व आहे, कारण या दिवशी महराष्ट्र राज्याची स्थापना झाली. मात्र एवढंच नाही १ मेला आंतरराष्ट्रीय महत्त्वदेखील आहे. कारण जगभरात हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा केला जातो. अठराव्या शतकात झालेल्या एका कामगार चळवळीच्या गौरवासाठी आजही जगभरात साजरा करण्यात येणारा हा एक खास दिवस आहे. भारतात कामगार दिनानिमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात येते. विशेष म्हणजे जगभरात अनेक देशांमध्ये हा दिन निरनिराळ्या पद्धतीने साजरा केला जातो. म्हणून कंपनीमालक आणि उद्योजकांनी मनमानी न करता कामगारांना त्यांच्या हक्काची सार्वजनिक- सरकारी रविवारची सुट्टी देणे अत्यंत रास्त आहे. !! कामगार दिनानिमित्त सर्व कामगारांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा ! !

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- 9423714883.**

# विरोधकांकडून जातीपातीचे गलिच्छ राजकारण, त्यांना जनता माफ करणार नाही - बबन भाऊ गित्ते

## बजरंग बप्पांचा परळी मतदार संघात डोअर टू डोअर प्रचार

**बीड / परळी**

महागाईने जनता त्रस्त असून रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सुविधांवरून जनतेच्या मनात तीव्र रोष आहे. तर विरोधकांकडून जातीपातीचे गलिच्छ राजकारण केले जात असून त्यांना जनता माफ करणार नाही. असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते यांनी परळी विधानसभा मतदार संघात इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ जनतेशी संवाद साधताना व्यक्त केला.

परळी विधानसभा मतदार संघात बीड लोकसभेचे इंडिया आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांचा प्रचारार्थ बबन भाऊ गित्ते, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, सुदामतीताई गुट्टे हे मागील पाच दिवसांपासून डोअर टू डोअर जाऊन जनतेशी संवाद साधून प्रचार करीत आहेत. तर सोमवारी परळी शहरातील आझाद नगर, गंगासागर नगर, प्रभाग क्रमांक २ मधील भागात प्रचार फेरी काढण्यात आली. या फेरी दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष बबन भाऊ गित्ते यांनी प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

पुढे बोलताना बबन भाऊ गित्ते म्हणाले की, या निवडणुकीत लोकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने तुतारी वाजणार आहे. धनंजय मुंडे पक्षात असले किंवा नसले तरी काहीही फरक पडणार नसून शरदचंद्र पवार यांना मानणारा प्रचंड मोठा वर्ग आहे. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी झालेल्या आंदोलनांमध्ये जमेल तसा सहभाग नोंदवला आहे. परळीत मनोज जरांगे पाटील आले, त्यावेळी ओबीसी म्हणून मी पहिल्यांदा त्यांचे स्वागत केले. भाजपचे नेते बीड जिल्ह्यात जातीयवादाचे बी पेरत आहेत. त्यांचा हा कुटील डाव जिल्ह्यातील जनतेने ओळखला आहे. म्हणून तब्बल दोन लाख मतांनी बजरंग बप्पा सोनवणे निवडून येणार



असल्याचा अविश्वास ही त्यांनी व्यक्त केला.

या प्रचार फेरीत शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नेते नारायण सातपुते, शहर प्रमुख राजेश विभुते, तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, तालुका उपप्रमुख महेश केंद्रे, सचिव प्रकाश साळुंके, संघटक सतीश जगताप, समन्वयक भरत इंगळे, जगन्नाथ साळुंके, आपचे शहर प्रमुख व त्यांचे सर्व कार्यकर्ते, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष बाबाजी शिंदे, महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षाताई रायभोळे, तालुकाध्यक्ष देवराव लुगडे महाराज, शहर अध्यक्ष जीवनराव देशमुख, युवक अध्यक्ष शंकर शेजुळ, काँग्रेस शहर अध्यक्ष बहादुर भाई, आंतरराष्ट्रीय मानवाधिकारचे अध्यक्ष जमील अध्यक्ष, जिल्हा सरचिटणीस प्रकाश मुंडे, कार्य अध्यक्ष शशीशेखर चौधरी, उपाध्यक्ष सुभाष देशमुख, अँड.प्रकाश मुंडे, अँड.सतीश देशमुख, भगवान कदम, इतेशाम खतीब, युवक विधानसभा अध्यक्ष रणजित देशमुख, अलीम भाई, फिरोज सैय्यद, मेहबूब कुरेशी, रमेश चौंडे, जेष्ठ नेते गुलाबराव देवकर, अनुसुचित जाती-जमाती अध्यक्ष दीपक शिरसाट, ओबीसी अध्यक्ष जावेद भाई, अल्पसंख्याक शहर अध्यक्ष रसूल खान, तालुका अध्यक्ष सद्दाम भाई, बद्दर भाई, अल्ताफ भाई, सियम, लखन सुरवसे, नवनीत संघई, संतोष साखरे, विशाल गावडे, मनोज गित्ते, रेखा लक्ष्मण जानराव, महिला आघाडी अध्यक्ष दिपाली सावंत, सविता नंदागवळी, अश्विनी सरवदे, गायकवाड, अस्लम खान, हमीद बाबा सय्यद, जावेद शेख, बुढण सय्यद, अकबर बादशाह, हसन भाई शेख, शाम वैरागे, फिरदोस पठाण, रहीम शेख, अमजद खान, महेश कुरेशी, अमीर शेख यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# बसस्थानक चकाचक , मोडकळीस आल्या बसेस, अंबाजोगाई आगाराचा कारभार रामभरोसे

प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन एसटी महामंडळ मिरवत असले तरी अंबाजोगाई आगाराचा कारभार मात्र 'रामभरोसे' चालू आहे. शहरातील बसस्थानक जरी चकाचक झाले असले तरी आगारातील बसेस मात्र मोडकळीस आलेल्या आहेत. याच मोडकळीस आलेल्या बसेस मधून प्रवाशांना पैसे खर्च करून प्रवास करण्याची वेळ आली आहे. पैसे घेता तर बसमध्ये सुविधा तरी द्या, अशी मागणी प्रवासी करित आहेत अंबाजोगाई आगाराचा उगम संघर्षातून झाला आहे. आगारासाठी अंबाजोगाईकरांना मोठे आंदोलन करावे लागले होते. आंदोलन केल्यानंतर आगाराची मागणी पूर्ण होऊन शहरातील मध्यवर्ती भागात एसटी महामंडळाचे बस आगार सुरु करण्यात आले. परंतू, या आगाराची परिस्थिती गेल्या काही वर्षांपासून 'जैसे थे' अशीच आहे. मोडकळीस आलेल्या बसेस, कर्मचारी वर्गाचा अभाव आणि बसेस दुरुस्तीसाठी होणारी दिरंगाई यामुळे



याचा फटका प्रवाशांना बसत आहे. शिवाय आगाराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कामकाजावर लक्ष नसल्याने आगाराचे कामकाज पूर्ण कोलमडून गेले आहे.

अंबाजोगाई आगारात जवळपास वीस ते पंचवीस बसेस अशा आहेत जे की रस्त्यावर चालविण्याच्या स्थितीत नाहीत. तरी देखील या बसेस रस्त्यावर धावल्या जातात, त्याही लांब पल्ल्याच्या ठिकाणी. या बसेस मधील दरवाजे, सीटस् पुर्णपणे तुटलेली आहेत. या बसेस मध्ये तांत्रिक बिघाड असतानाही तारेवरची कसरत करीत प्रवाशांना पोहचविण्याचे काम चालक आणि वाहक करीत आहेत. प्रवाशांनाही ऐनवेळी दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांनाही याच बसेसचा आधार घेत प्रवास पुर्ण करावा लागत आहे.

मोडकळीस आलेल्या बसेस दुरुस्त करा अंबाजोगाई आगारातील मोडकळीस आलेल्या बसेस तात्काळ दुरुस्त करा, जेणेकरून प्रवाशांचा प्रवास सुखद होईल, अशी मागणी प्रवासी करीत आहेत. शिवाय अंबाजोगाई बसस्थानकातून दिलेल्या वेळेत बसेस सुटत नाहीत. त्यामुळे प्रवाशांना तासनतास बसची वाट पाहत स्थानकात बसावे लागते. याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे दिलेल्या वेळेत बसेस सोडण्यात याव्यात, अशीही मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# 'स्वाराती' ची सिटी स्कॅन मशीन बंद

अंबाजोगाई प्रतिनिधी /परवेज पटेल

'स्वाराती' रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन गेल्या चार महिन्यांपासून बंद असल्याने त्याचा त्रास मात्र रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना सहन करावा लागत आहे. अंबाजोगाई शहरातील खाजगी सिटी स्कॅनचे दर गोरगरीब रुग्णांना परवडत नसल्याने त्यांना परळी येथील उपजिल्हा रुग्णालयाचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे रुग्णांना आजारासोबत मानसिक त्रासही सहन करावा लागत आहे. स्वाराती' रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन तात्काळ दुरुस्त करून रुग्णांसाठी उपलब्ध करावी, अशी मागणी रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांकडून करण्यात येत आहे. 'स्वाराती' रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या रेडियोलॉजी विभागांतील सिटी स्कॅन मशीन गेल्या चार महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे गोरगरीब रुग्णांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णालयाने शासनदरबारी अनेकदा प्रस्ताव पाठवून देखील त्याचा काही उपयोग होताना दिसून येत नाही. केवळ दुरुस्ती अभावी सिटी स्कॅन धूळ खात पडल्याने रुग्णांना एक तर जास्त पैसे देऊन खाजगीतून सिटी स्कॅन करून घ्यावे लागत आहे नाही तर परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात जाऊन सिटी स्कॅन करून परत वापस यावे लागत आहे. त्यामुळे रुग्णांची आणि नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे स्वाराती' रुग्णालयाच्या रेडियोलॉजी विभागात 12 वर्षापूर्वी 'फिलिप्स' कंपनीची सिटी स्कॅन मशीन बसवली आहे. गेल्या 12 वर्षापासून या मशीनने अहोरात्र सेवा दिली आहे. कोरोना काळातही ही मशीन रात्रंदिवस रुग्णांसाठी सुरू होती. परंतू, गेल्या चार महिन्यापुर्वी या मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ही मशीन बंद पडली आहे. जिल्हाधिकारी मुधोळ यांनी दिले 80 लाख 'स्वाराती' रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन बंद असल्याने रुग्णांचे हाल होत आहेत, ही माहिती जिल्हाधिकारी दिपा मुधोळ – मुंडे यांना समजतात त्यांनी तात्काळ मशीन दुरुस्तीसाठी 80 लाख रुपयांचा निधी 'स्वाराती' रुग्णालयाच्या प्रशासनास उपलब्ध करून दिला. परंतू, फिलिप्स कंपनीच्या टीमने अहोरात्र मेहनत करुनही मशीन दुरुस्त नाही. शासन स्तरावर पाठपुरावा सुरु आहे अधिष्ठाता धपाटे 'स्वाराती' रुग्णालयातील सिटी स्कॅन मशीन गेल्या काही महिन्यापासून बंद आहे, ही बाब खरी आहे. मशीन दुरुस्तीसाठी आम्ही शासन स्तरावर आणि फिलिप्स कंपनीशी सातत्याने पत्रव्यवहार करत आहोत.

# शिरेसायगाव येथे दिवसाढवळ्या चोरट्यांचा महिलेवर चाकुहल्ला, गावकऱ्यांनी सिनेस्टाईल पाठलाग करत चोरट्याना पकडले व दिला निबार चोप.

**सुनिल झिंजूर्डे पाटील**

गंगापूर तालुक्यातील शिल्लेगाव पोलीस ठाणे हद्दीतील शिरेसायगाव येथील गावात राहणाऱ्या एका महिलेवर गावात भिक्षा मागणाऱ्या चोरट्यांनी घरात कोणी नसल्याचे पाहून महिलेच्या दीड महिना वयाच्या मुलाच्या गळ्याला चाकू लावून कपाटाच्या चाव्या मागितले असता महिलेने ओरडाओरडी चालू केली त्यामुळे चोरट्यांनी घरातूनच चाकू घेऊन महिलेच्या पोटात चाकू खुपसला मात्र महिलेने तरीही आरडाओरडा चालू केली मात्र महिलेच्या शेजारील एका कुटूंबात विवाह असल्याने बहुतेक गावकरी लग्न सोहळ्यासाठी बाहेरगावी गेले होते त्यामुळे मदतीसाठी लवकर कोणी आले नाही मात्र महिलेने आरडाओरड केल्याने चोरट्यांनी गावातून धूम ठोकली गावात ही वार्ता मोबाईलद्वारे वाऱ्यासारखी पसरतात गावातील युवकांनी मोबाईल द्वारे एकमेकांना संपर्क साधून घटनेची माहिती पंचक्रोशीतील गावात दिली त्यामुळे गावात उपस्थित असलेल्या काही युवकांनी त्या चोरट्यांचा शोध घेतला असता चोरटे खडक वाघलगाव रस्त्याने गेले असल्याची माहिती मिळाली त्यामुळे वाघलगाव शिरेसायगाव,गोपाळवाडी, वडाळी येथील गावकऱ्यांनी तब्बल दीड किलोमीटर सिनेस्टईल पाठलाग करून चोरट्यांना पकडले व निबार चोप दिला व शिल्लेगाव पोलिसांच्या ताब्यात दिले सदर घटना दिवसाढवळ्या अकरा वाजता, घडली मात्र या घटनेने पंचक्रोशीतील गावकऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बसस्थानक चकाचक : मोडकळीस आल्या बसेस, अंबाजोगाई आगाराचा कारभार रामभरोसे

प्रवाशांच्या सेवेसाठी' हे ब्रीदवाक्य घेऊन एसटी महामंडळ मिरवत असले तरी अंबाजोगाई आगाराचा कारभार मात्र 'रामभरोसे' चालू आहे. शहरातील बसस्थानक जरी चकाचक झाले असले तरी आगारातील बसेस मात्र मोडकळीस आलेल्या आहेत. याच मोडकळीस आलेल्या बसेस मधून प्रवाशांना पैसे खर्च करून प्रवास करण्याची वेळ आली आहे. पैसे घेता तर बसमध्ये सुविधा तरी द्या, अशी मागणी प्रवासी करित आहेत अंबाजोगाई आगाराचा उगम संघर्षातून झाला आहे. आगारासाठी अंबाजोगाईकरांना मोठे आंदोलन करावे लागले होते. आंदोलन केल्यानंतर आगाराची मागणी पूर्ण होऊन शहरातील मध्यवर्ती भागात एसटी महामंडळाचे बस आगार सुरु करण्यात आले. परंतू, या आगाराची परिस्थिती गेल्या काही वर्षांपासून 'जैसे थे' अशीच आहे. मोडकळीस आलेल्या बसेस, कर्मचारी वर्गाचा अभाव आणि बसेस दुरुस्तीसाठी होणारी दिरंगाई यामुळे याचा फटका प्रवाशांना बसत आहे. शिवाय आगाराच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे कामकाजावर लक्ष नसल्याने आगाराचे कामकाज पूर्ण कोलमडून गेले आहे. अंबाजोगाई आगारात जवळपास वीस ते पंचवीस बसेस अशा आहेत जे की रस्त्यावर चालविण्याच्या स्थितीत नाहीत. तरी देखील या बसेस रस्त्यावर धावल्या जातात, त्याही लांब पल्ल्याच्या ठिकाणी. या बसेस मधील दरवाजे, सीटस् पुर्णपणे तुटलेली आहेत. या बसेस मध्ये तांत्रिक बिघाड असतानाही तारेवरची कसरत करीत प्रवाशांना पोहचविण्याचे काम चालक आणि वाहक करीत आहेत. प्रवाशांनाही ऐनवेळी दुसरा पर्याय उपलब्ध नसल्याने त्यांनाही याच बसेसचा आधार घेत प्रवास पुर्ण करावा लागत आहे.मोडकळीस आलेल्या बसेस दुरुस्त करा अंबाजोगाई आगारातील मोडकळीस आलेल्या बसेस तात्काळ दुरुस्त करा, जेणेकरून प्रवाशांचा प्रवास सुखद होईल, अशी मागणी प्रवासी करीत आहेत. शिवाय अंबाजोगाई बसस्थानकातून दिलेल्या वेळेत बसेस सुटत नाहीत. त्यामुळे प्रवाशांना तासनतास बसची वाट पाहत स्थानकात बसावे लागते. याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे दिलेल्या वेळेत बसेस सोडण्यात याव्यात, अशीही मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

मंगळवार ३० एप्रिल २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

लाईफ कॉम्प्युटर्स
सेल्स ॲण्ड सर्व्हिसेस
कॉम्प्युटर । लॅपटॉप । प्रिंटर । रिफर्ब लॅपटॉप
9404800081 / 7020240121
www.lifecomputerbeed.com"
बी.एस.एन.एल.ऑफिस च्या बाजुला,डी.पी.रोड, बस स्टॅंडच्या मागे,बीड

# वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ

# ॲड. प्रकाश आंबेडकर उतरले रनागणात

## दिनांक 3 मे रोजी आंबेजोगाई मार्केट ग्राउंड वर होणार जाहीर सभा



बीड (प्रतिनिधी) बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांच्या प्रचारार्थ एड.बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर यांनी दंड थोपटले असून झंजावाती प्रचारासाठी रणांगणात उतरले आहेत दिनांक 3 मे रोजी आंबेजोगाई येथील मार्केट ग्राउंड वर आंबेडकर यांची जाहीर सभा होणार आहे. तरी सभेस जिल्ह्यातील मतदार बंधूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशा आव्हान अशोकराव हिंगे पाटील यांनी केले आहे लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी जोरात चालू असून वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा प्रचार वेगात सुरू आहे अकोला लोकसभा मतदारसंघाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून आता बीड जिल्ह्याकडे लक्ष देण्यासाठी ऍड. प्रकाश आंबेडकर यांनी दंड थोपटले असून रणांगणात उतरले आहेत बाळासाहेब आंबेडकर दि.2 मे रोजी बीड जिल्ह्यात मुक्कामी येत असून ते अनेक नेते कार्यकर्त्यांच्या भेटी घेणार चर्चा करून संवाद साधणार आहेत यामुळे जिल्ह्यात अनेक घडामोडी घडवून प्रचारात रंगत येणार आहे दिनांक 3 मे रोजी आंबेजोगाई येथील मार्केट ग्राउंड वर संध्याकाळी 5:00 वाजता सभा सुरू होईल तरी जिल्ह्यातील सुज्ञ मतदार बंधू-भगिनींनी भव्य दिव्य होणाऱ्या जाहीर सभेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून विजयाचे शिल्पकार व्हावे असे आव्हान बीड लोकसभेचे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी केले आहे.



## माळेगाव मध्य भीम जयंती मोठया उत्साहात साजरी...

दर वर्षी २९ एप्रिल रोजी माळेगाव मध्य भीमजयंती साजरी केली जाते. दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी भीमजयंती मोठया उत्साहात साजरी केली.भीमजयंती साजरी करण्याच्या उद्देशाने आसपासाच्या गावातील भीमसैनिक एकत्र आले .जयंती अध्यक्ष मिलिंद भालेराव , उपाध्यक्ष मस्सू बचुटे, सचिव सतीश भालेराव कोषध्यक्ष प्रवीण दहातोंडे,तसेच सदस्य कुमार भालेराव,राजाभाऊ भालेराव, अच्युत भालेराव, लहू भालेराव, आकाश भालेराव, साहेबराव वाघमारे, बाळू भालेराव, भारत भालेराव, काका भालेराव, सुरेश भालेराव, भिखा दहातोंडे, बालन मस्के तसेच इतर गावातील भीमसैनिक यांनी भीम जयंती साजरी करण्यात मोलाची भूमिका बजावली. प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक वादळ वार्ताचे संपादक अजय भांगे, प्रा.धनराज भालेराव, रणधिर ठोके,उपसरपंच नितीन बचूटे, बंडू मस्के यांनी प्रमुख उपस्थित दर्शविली. भीमजयंती कार्यक्रमामध्य सत्यनारायण भालेराव व प्रकाश बचूटे यांनी अन्नदानाचा पाहुणचार केला.

भीमजयंती शांततेत व मोठया उत्साहात साजरी झाल्याने अध्यक्ष मिलिंद भालेराव यांनी सर्व भीमसैनिक व गावकऱ्याचे आभार मानले.



केज तालुक्यातील कानडी माळी येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवा निमित्त मनोगत व्यक्त करताना केज तालुक्यातील प्रसिद्ध बालरोग तज्ञ डॉ. दिनकर राऊत

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com